प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्रीमती अस्मिता सुधाकर बाजी, संचालक संवर्ग.

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन आदेश:- संलेको-२०२४/प्र.क्र.१२४/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०१.०७.२०२५.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
03 JUL 2025
प्राप्त झाले सही....

**संदर्भ**:- १) सहसंचालक (प्रशासन),लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा-राप/का-६/प्र.का./श्रीम.बाजी/संचालक/०५.२४/६६३/५७५/२४०४, दि.०९.०५.२०२४,

२) महाराष्ट्र संशोधन,उन्नती, व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांचे आदेश क्र.अमृत/प्र.क्र.१०/२०२४/५८, दि.०७.०३.२०२४,

३) सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय,पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे(राप)/प्रतिक्षाधिन/०३/२०२४/७३०, दि.१३.०३.२०२४,

४) शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.४०/को.प्र.२, दि.१४.०३.२०२४,

५) सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे (राप)/कार्यमुक्त-श्रीम.अ.सु.बाजी/०३/२०२४/८११,दि.१८.०३.२०२४

६) प्र.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,पुणे यांचे आदेश जा. क्र.मरापम/आस्थापना/वि.स.प्रतिनि/३०२, दि.२१.०३.२०२४,

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील श्रीमती बाजी, यांना महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे येथील कार्यालयीन आस्थापनेवरुन संदर्भ क्र.२ अन्वये दि.०७.०३.२०२४ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. शासन दि.२०.०२.२००८ रोजीच्या परिपत्रकातील तरतूदीनुसार, दि.०८.०३.२०२४ (महाशिवरात्री) आणि दि.०९ व दि.१०.०३.२०२४ ची साप्ताहिक सुट्टी उपभोगून संदर्भ क्र.३ अन्वये श्रीमती बाजी ह्या सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे येथील कार्यालयात प्रतिक्षाधिन संचालक म्हणुन दि.११.०३.२०२४ (म.पु.) रोजी रुजू झाल्या.

20

३. संदर्भ क्र.४, शासन वित्त विभाग दि.१४.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती बाजी यांना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,पुणे येथे महाव्यवस्थापक (ले. व प.) तथा वित्तीय सल्लागार या पदावर पदस्थापना देण्यात आली.

४. त्याअनुषंगाने, श्रीमती बाजी यांना महाव्यवस्थापक (ले.व प.) तथा वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे या पदस्थानपनेच्या पदावर हजर होण्यासाठी संदर्भ क्र.५ अन्वये दि.१८.०३.२०२४ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले असून संदर्भ क्र.६ अन्वये दि.१८.०३.२०२४ (म.पू.) रोजी त्या पदस्थापनेच्या पदावर हजर झालेल्या आहेत.

५. श्रीमती बाजी यांचा पुढीलप्रमाणे प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करण्यात येत आहे:

00818/2025/1197
03-07-25

| अ.क्र. | कालावधी | एकुण दिवस | नियमित करावयाचा कालावधी/शेरा |
|---|---|---|---|
| १. | दि.०८.०३.२०२४ ते दि.१०.०३.२०२४ | ०३ दिवस | दि.०८.०३.२०२४ (महाशिवरात्री), दि.०९ व दि.१०.०३.२०२४ ची साप्ताहिक सुट्टी |
| २. | दि.११.०३.२०२४ ते दि.१७.०३.२०२४ | ०७ दिवस | सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे या कार्यालयात प्रतिक्षाधिन संचालक म्हणून कार्यरत. |
| | एकुण कालावधी | १० दिवस | |

3/7/25

६. यास्तव, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतूदीच्या अधीन राहून, संचालक संवर्गातील श्रीमती अस्मिता सुधाकर बाजी यांचे दि.०८.०३.२०२४ ते दि.१७.०३.२०२४ पर्यंत नियमित करावयाच्या प्रतिक्षाधीन कालावधीचे (दि.०८.०३.२०२४ ते दि.१०.०३.२०२४ या ३ दिवसांच्या महाशिवरात्री व साप्ताहिक सुट्टयांच्या कालावधीसह) वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता.र.पवार)
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रत:-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव ( लेखा व कोषागारे ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) सहसंचालक,लेखा व कोषागारे,पुणे विभाग,पुणे, *
६) श्रीमती अस्मिता सु. बाजी, महाव्यवस्थापक (ले.व प.) तथा वित्तीय सल्लागार,महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे,*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

* ( संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत )